वाचले:-
१ श्रीमती पवार छाया धोंडीराम,सफाई कामगार यांचा दिनांक 27/09/2024 रोजीचा स्वेछा सेवानिवृत्ति मिळणेबाबतचा अर्ज.
२ क्षेत्रीय अधिकारी, इ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक इक्षेका/आ/06/कावि/886/2024 दिनांक 13/12/2024
३ महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तिवेतन नियम 1982 मधील नियम 66
४ अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/1/कावि/1175/2013 दिनांक 29/08/2013

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/5/कावि/690/2024
दिनांक १८।१२।२०२४

विषय:- श्रीमती पवार छाया धोंडीराम , सफाई कामगार
( संगणक क्रमांक 8555 ) यांना स्वेच्छा सेवानिवृत्ति मंजूर करणेबाबत......

आदेश,

श्रीमती पवार छाया धोंडीराम , ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील सफाई कामगार या गट ड मधील पदावर इ क्षेत्रीय आरोग्य विभाग अंतर्गत इ क्षेत्रीय आरोग्य 1 येथे कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक 27/09/2024 रोजीच्या अर्जान्वये वैद्यकिय कारणास्तव स्वेच्छानिवृत्ति मिळणेबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम 1982 मधील नियम 66 नुसार कर्मचा-याची 20 वर्ष इतकी अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिका-यांस 3 महिन्याची लेखी नोटीस देवून सेवेतून केव्हांही सेवानिवृत्त होता येईल अशी तरतूद आहे. आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/५४६/२०१६, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचा-याने स्वेच्छा निवृत्तीबाबत लेखी नोटीस (तीन महिने अगोदर) देऊन स्वत:हून सेवानिवृत्त मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे अशा अधिकारी / कर्मचा-यास त्याने दिलेल्या तीन महिन्यांच्या लेखी नोटीशीची तीन महिन्यांची मुदत संपल्यानंतरच्या लगतच्या दिनांकास मध्यान्हनंतर महापालिका सेवेमधून सेवानिवृत्त करण्यात यावे. असे आदेश पारित करण्यात आले आहेत.

श्रीमती पवार छाया धोंडीराम , यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारिख 24/07/1969 अशी असून दिनांक 10/01/2003 रोजी त्या मनपा आस्थापनेवरील सफाई कामगार पदावर रूजू झाल्या आहेत. दिनांक 27/12/2024 पर्यंत त्यांची मनपामधील एकूण सेवा 21 वर्ष 11 महिने 17 दिवस इतकी पूर्ण होत आहे.त्यामध्ये त्यांचा 0दिवस कालावधी विनावेतनी केला आहे.

क्षेत्रीय अधिकारी,इ क्षेत्रीय कार्यालय यांनी उपरोक्त वाचले क्र.2 रोजीचे पत्रान्वये श्रीमती पवार छाया धोंडीराम , सफाई कामगार, यांचें कडून मनपाचे वाहन कर्ज, संगणक कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, घरबांधणी कर्ज, कामगार कल्याण•निधी कर्ज व वैद्यकीय अग्रीम येणे बाकी नाही. तसेच सणअग्रीम चे ४५००/- येणे बाकी असल्याचे दिसुन येत आहे. तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही, असा अहवाल सादर केला असून, त्यांना स्वेच्छासेवानिवृत्ति मंजूर करणेस स्पष्ट शिफारस केलेली आहे.

सबब श्रीमती पवार छाया धोंडीराम, सफाई कामगार, यांनी दिनांक 27/09/2024 रोजीच्या अर्जान्वये स्वेच्छासेवानिवृत्ति मिळावी म्हणून केलेली विनंती क्षेत्रीय अधिकारी,इ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील शिफारस व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ति वेतन नियम 1982 मधील उक्त तरतूद विचारात घेऊन श्रीमती पवार छाया धोंडीराम ,सफाई कामगार यांना दिनांक 27/12/2024 रोजी मध्यान्हंतर महापालिका सेवेतून स्वेच्छासेवानिवृत्ति देण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

श्रीमती पवार छाया धोंडीराम, यांना निवृत्ति वेतन,सेवाउपदान इ.रकमा अदा करण्यासाठी संबंधित विभागाने आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून प्रकरण त्वरीत लेखाविभागाकडे सादर करावे. लेखाविभागाने श्रीमती पवार छाया धोंडीराम, सफाई कामगार याचेकडून मनपाचे घरबांधणी कर्ज, वाहनकर्ज, संगणक कर्ज,तसेच वैद्यकीय अग्रिम इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय?या बाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमत: देय रक्कम त्यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तिच्या दिनांकास अदा करावी.तथापी लेखापरीक्षणार्थ येणे रक्कम निघाल्यास ती श्रीमती पवार छाया धोंडीराम यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018.

प्रति,
श्रीमती पवार छाया धोंडीराम , सफाई कामगार
इ क्षेत्रीय आरोग्य 1 विभाग.
प्रत :-
1) लेखा विभाग 2) लेखा परीक्षण विभाग 3) सामान्य प्रशासन टेबल क्र.7,10,12,14,15 4) सामान्य प्रशासन विभाग-संगणक कक्ष 5) दूरसंचार विभाग 6) कामगार कल्याण विभाग 7) विद्युत विभाग 8) पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी महासंघ 9) पिंपरी चिंचवड मनपा सेवकांची पतसंस्था
10) इ क्षेत्रीय आरोग्य 1 विभाग-
2/- सोबत श्रीमती पवार छाया धोंडीराम, सफाई कामगार यांचे मूळ सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविणेत येत आहे.